## नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ३०/२०१७ मध्ये
## निशाण ३३ खालील आदेश

१. दावा मिळकतीमधील झाडे तोडून दावा मिळकतीचे अवमुल्यन करु नये, अशी तूर्तातूर्त ताकीद प्रतिवादी क्र.१ विरुध्द मिळणेसाठी वादीने प्रस्तूत अर्ज दाखल केला आहे. मौजे रामाणे, ता. लांजा, जि. रत्नागिरी येथील गट नं.१३५अ व १४२ ह्या शेतजमिनी प्रस्तूत अर्जाचा विषय असून त्यास यापुढे संक्षेपार्थ ''*दावा मिळकत*'' असे संबोधले आहे.

अर्जातील वादीचे कथनांचा सारांश पुढील प्रमाणे–

२. दावा मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित मालकी वहिवाटीची असून त्यात वडिलोपार्जित हापूस आंब्याची आठ कलमे तसेच वादीने लावलेली व जोपासलेली काजुची ५० कलमे आहेत. प्रस्तूत वाटपाचा दावा दाखल झाल्याने दावा मिळकतीत वादींना हिस्सा मिळणार याची धास्ती प्रतिवादी क्र.१ ने घेतली असून दावा मिळकतीतील उत्पन्न वादीला मिळू नये व दावा मिळकतीचे अवमुल्यन व्हावे, यासाठी प्रतिवादी क्र.१ हे दावा मिळकतीतील मौल्यवान व उत्पन्न देणारी झाडे तोडण्याच्या तयारीत आहेत. महसूल दप्तरी नाव असल्याचा फायदा घेऊन प्रतिवादी क्र.१ दावा मिळकतीतील झाडे तोडण्याची शक्यता आहे. सबब, प्रस्तुत अर्ज.

३. प्रतिवादी क्र.१ यांनी निशाण ३५ येथे म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर विरोध केला. प्रतिवादी क्र.१ यांच्या म्हणण्यातील सारांश पुढील प्रमाणे आहेः–

दावा मिळकतीत असलेली हापूस आंब्याची कलमे व काजुची झाडे प्रतिवादी क्र.१ याने अंगमेहनत करुन जोपासली आहेत व त्यातून मिळणा–या थोडयाफार उत्पन्नावर प्रतिवादी क्र.१ व त्याचे पत्नीचा उदरनिर्वाह चालतो. सदर मौल्यवान झाडे वादीने लावलेली व जोपासलेली नाहीत. फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१२६/२०१५ चे कामी वादीने सादर केलेल्या म्हणण्यात विसंगत अशी कथने वादीने प्रस्तूत अर्जात केली आहेत. प्रतिवादी क्र.१ हे कोणतीही झाडे तोडण्याच्या तयारीत नाहीत. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा, असे प्रतिवादीचे म्हणणे आहे.

४. अर्ज व म्हणण्यातील परस्पर विरोधी कथनांनुसार पुढील वाद प्रश्न विचारार्थ उपस्थित होतात. सदर वाद प्रश्न व त्यांचे निष्कर्ष कारण मिमांसेसह पुढील प्रमाणे आहेत.

| **वाद प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. प्रथम दर्शनी केस असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | ..................नकारार्थी. |
| २. सोयीची बाब वादीचे बाजूने आहे काय ? | ..................नकारार्थी. |
| ३. अर्ज नामंजूर झाल्यास अपरिमित नुकसान होणार असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | ..................नकारार्थी. |
| ४. आदेश काय ? | .............. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

५. वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य वकिलांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

## <u>का र ण मि मां सा.</u>

## <u>वाद प्रश्न क्रमांक १ ते ३ करीता</u>

६. दावा मिळकती व त्यातील हापूस आंब्यांची कलमे वडिलोपार्जित असल्याचे वादीचे कथन आहे. याउलट, दावा मिळकतींचे पुर्वीच तोंडी वाटप झाले असून स्वतंत्र वहिवाटी असल्याचे व दावा मिळकतीतील हापूस आंब्याची कलमे व काजुची झाडे प्रतिवादी क्र.१ यांनी लावली व जोपासली असल्याचे प्रतिवादी क्र.१चे कथन आहे. प्रस्तुत दावा वाटपासाठी दाखल असल्याने दावा मिळकती वडिलोपार्जित आहेत अगर कसे, ही बाब चौकशीचे वेळी गुणदोषांवर निर्णित होणार आहे.

७. प्रस्तूत अर्जाचे अवलोकन करता दावा मिळकतीत असणारी हापूस आंब्याची व काजुची झाडे मौल्यवान व उत्पन्न देणारी आहेत, असे वादीचे कथन आहे. सदर झाडांच्या उत्पनावर प्रतिवादी क्र.१ व त्यांच्या पत्नीचा उदरनिर्वाह चालतो, असे प्रतिवादी क्र.१ चे कथन आहे. दावा मिळकतीतील सदर आंबा व काजुची झाडे तोडण्यासाठी प्रतिवादी क्र.१ ने प्रयत्न केला, असे दर्शविणारी विशिष्ट तारखेची अगर विशिष्ट महिन्याची घटना अर्जात नमूद नाही. प्रस्तूत अर्ज

दिनांक २१/६/२०१८ रोजी दाखल झाला असून मागील दिड वर्षाचे कालावधीत प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकतीतील एखादे झाड तोडले अगर किमान तोडण्याचा प्रयत्न केला, अशी विशिष्ट घटना घडली असल्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे, मौल्यवान व उत्पन्न देणारी झाडे तोडण्याच्या तयारीत प्रतिवादी क्र.१ आहेत, ही बाब सकृतदर्शनी विश्वसनीय वाटत नाही व तशी प्रथमदर्शनी केस वादीने सिध्द केलेली नाही.

८. अभिलेखाचे अवलोकन करता दावा मिळकतीतील काजु व आंबा कलमांच्या लिलावासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक व्हावी, यासाठी वादीने दाखल केलेला निशाण ३६ येथील अर्ज नामंजूर झाला आहे. वादी यांचे वय व अर्जात नमूद केलेल्या झाडांचे वय पाहता सदर झाडे वादी यांनी लावली व जोपासली ही बाब सकृतदर्शनी स्वाभाविक वाटत नाही, असे अनुमान माझे पुर्वाधिकारी यांनी केलेल्या आदेशात नमूद आहे.

९. प्रतिवादी क्र.१ यांनी वादीविरुध्द पोटगी मिळण्यासाठी फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१२६/२०१५ हे प्रकरण दाखल केले याबाबत अभिलेखावर वाद नाही. त्या किरकोळ अर्जाचे कामी प्रस्तूत वादी यांनी दिलेल्या म्हणण्याची प्रत प्रतिवादी क्र.१ यांनी निशाण ४१/१ येथे दाखल केली आहे. त्या प्रतीचे अवलोकन करता दावा मिळकतीत काजुची व हापूस आंब्याची झाडे असून त्याचे उत्पन्न प्रतिवादी क्र.१ घेतात असे प्रस्तूत वादीचे कथन आहे. यावरुन देखील ज्या झाडांवर चरितार्थ अवलंबून आहे ती झाडे प्रतिवादी क्र.१ तोडून टाकण्याच्या तयारीत आहे हे वादीचे कथन सकृतदर्शनी स्वाभाविक वाटत नाही. एखादी घटना भविष्यात घडू शकेल, असे वाटत आहे, एवढयाच कथनावर प्रथमदर्शनी केस सिध्द होऊ शकत नाही. सदर घटना घडेल, अशी विशिष्ट परिस्थिती निर्माण झाली होती अगर आहे व तशी घटना नजीकच्या काळात निश्चित घडेल, अशी सार्थ भिती वाटण्याइतपत परिस्थिती निर्माण झाली आहे, ही बाब प्रथमदर्शनी दर्शनी केस सिध्द करण्याकरीता अत्यावश्यक आहे. वर नमूद केलेल्या विवेचनावरुन वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केलेली नाही, हे स्पष्ट होते. त्यामुळे, वादीचे अपरिमित नुकसान होण्याचा मुद्दा शिल्लक राहत नाही. सोईची बाब वादीचे बाजूने असल्याचे देखील सिध्द होत नाही. सबब, वाद प्रश्न क्रमांक १ ते ३ यांचे

निष्कर्ष नकारार्थी देण्यात येत आहेत. वरील निष्कर्षांनुसार प्रस्तूत अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब, वादप्रश्न क्रमांक ४ करीता पुढील प्रमाणे आदेश करण्यातयेत आहे.

**आ दे श**

१. वादी यांचा निशाण ३३ येथील अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

२. खर्चाची बाब अंतिम निर्णयाच्या वेळी विचारात घेतली जाईल.

**दिनांक २०/१/२०२० (जी.एम.साधले)**
**ठिकाण लांजा. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, लांजा,**
**ता.लांजा, जि.रत्नागिरी**

*Case No : RCS No.30 of 2017*
*I affirm that the contents of this pdf file Judgment/Order are same words as per original Judgment,*
*Name of the Stenographer: Y.S.Lahute*
*Court Name: Civil & Criminal Court, Lanja, Dist.Ratnagiri,*
*Date of decision : 20/1/2020*
*Judgment/Order signed by P.O.on : 21/1/2020,*
*Judgment/Order uploaded on : 21/1/2020*